सायं.दैनिक
# विश्वनायक
• संपादक : बिलाल शेख •
Email : vishvanayak94@gmail.com
Mo.86868 88898




बीड (महाराष्ट्र) दैनिक द्विभाषिक | वर्ष ०२ अंक - ३०२ शुक्रवार दि.०७ नोव्हेंबर २०२५ | आरएनआय -एमएएचबीआयएल १०५४८ | किंमत २ रु | पाने ४
Beed (Maharashtra) Daily BILINGUAL | Year 02 Issue - 302 FRIDAY, DT.07 NOVEMBER 2025 | TC : MAHBIL10548 | PRICE - 2 RUPEES PAGES - 4

# भ्रष्टाचाराने बरबटलेल्या स्वार्थी लोकांना तिकीट देणार का ? राजकीय पक्षांना जनतेचा सवाल

## तिकीट मागणाऱ्या काही माजी नगरसेवकांनी ब्लॅकमेलिंग करून मुख्याधिकाऱ्याकडून पैसे उकळले

### काही माजी नगरसेवकांनी नगरपालिकेच्या जागेवर अतिक्रमण केल्याची चर्चा

### भ्रष्ट सत्ताधाऱ्यांना शहरातून हद्दपार करा.! शहर वाचवायचं आहे, विकायचं नाही – प्रामाणिक नेतृत्वासाठी जनतेची हाक.!

१ भ्रष्ट लोकांच्या हातात शहर सोपवू नका ! शहर विकत घ्यायचं नाही वाचवायचं आहे

२ राजकारण नको जबाबदारी पाहिजे, बीडकरांचा स्पष्ट संदेश




**बीडला नव्या चेहऱ्याची गरज जुन्या भ्रष्ट व्यवस्थेवर जनता बंड करण्याच्या तयारीत..**

**आतापर्यंत भ्रष्टाचाराच्या दलदलीत नगरपालिका अडकली मात्र आता मोकळा श्वास घेण्याची वेळ आली**

विश्वनायक न्यूज

बीड नगरपालिकेतील नगराध्यक्षपद यंदा अनुसूचित जातीसाठी राखीव झाल्याने शहरातील राजकीय हालचालींना वेग आला आहे. मात्र, या पार्श्वभूमीवर भ्रष्टाचाराचे आरोप आणि स्वार्थी राजकारण पुन्हा एकदा चर्चेत आले आहे.आयुष्यभर भ्रष्टाचाराच्या सावटाखाली काम करणाऱ्या नगरसेवकांच्या हातात पुन्हा शहराचे नेतृत्व द्यायचे का? असा सवाल आता नागरिकांतून जोरात उपस्थित केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, काही नगरसेवकांनी नगरपालिकेच्या जागांवर अतिक्रमण केले, नगरपरिषद अधिकाऱ्यांवर दबाव आणला आणि फुकटच्या कामांचे पैसे मिळविण्यासाठी विविध युक्त्या वापरल्या. इतकेच नव्हे तर त्यावेळच्या मुख्याधिकाऱ्यांना ब्लॅकमेल करून निर्णय बदलवून घेण्याचे प्रकार घडल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.अनेक प्रकरणांमध्ये काही नगरसेवकांनी मुख्याधिकाऱ्यांविरोधात तक्रारी दाखल केल्या, आणि नंतर पैसे घेऊन त्या मागे घेतल्याची चर्चा देखील रंगली आहे. हे सगळे घडले तरी संबंधितांवर कारवाई झाली नाही, त्यामुळे भ्रष्टाचाराला प्रोत्साहनच मिळाल, असे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. बीड शहरातील रविवारच्या आठवडी बाजारत जाण्यासाठी मुख्य रस्त्याकडून जाणारा मार्ग माजी नगरसेवकांच्या अतिक्रमणामुळे अडवला गेल्याने नागरिकांना प्रचंड गैरसोय होते. या अतिक्रमणाविरोधात वारंवार तक्रारी होऊनही प्रशासनाचे कारवाईकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.जनतेच्या सोयीपेक्षा स्वार्थ महत्त्वाचा ठरला आहे,अशी नाराजी व्यक्त करण्यात येत असून, अशा भ्रष्टाचारांनी बरबटलेल्या आणि सतत स्वार्थी राजकारण करून, स्वतःची झोळी भरणाऱ्या भ्रष्ट लोकांना राजकीय पक्ष तिकीट देणार आहेत का ? असा योग्य सवाल संतप्त जनतेतून केला जात आहे.राजकीय पार्श्वभूमी असलेल्या अनेक नगरसेवकांनी आता नगराध्यक्षपदासाठी तिकीट मिळविण्यासाठी हालचाली सुरू केल्या आहेत.

### स्वच्छ प्रतिमा असलेल्यांना प्राधान्य द्या....

बीड शहराचा विकास आणि नगरपालिकेची स्वच्छ प्रतिमा टिकवायची असेल, तर नागरिकांचा आवाज आणि पारदर्शकतेची मागणी यांना राजकीय पक्षांनी गांभीर्याने घ्यावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. भ्रष्टाचाराने बरबटलेले हात सध्या तिकीट मागत आहेत मात्र बदनाम झालेल्या बीड नगरपालिकेला स्वच्छ प्रतिमा असलेल्या व्यक्तीची गरज आहे. तेच तेच चेहरे जनतेसमोर ठेवण्यापेक्षा मोठ्या राजकीय पक्षांनी चारित्र्यवान अन सुशिक्षित चेहरा शहराला द्यावा अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

मात्र, भ्रष्टाचार आणि अतिक्रमणाच्या आरोपांमुळे नागरिकांमध्ये संताप उसळला आहे.अशा लोकांना तिकीट देणे म्हणजे भ्रष्टाचाराला मोकळा रस्ता देणे असेच आहे. शहराला प्रामाणिक, निष्कलंक नेतृत्वाची गरज आहे, असे एकमत नागरिकांमध्ये दिसून येत आहे. आता सर्वांचे लक्ष प्रमुख राजकीय पक्षांकडे लागले आहे. हे पक्ष लोकांच्या भावना ओळखून प्रामाणिक उमेदवार पुढे करतात की जुन्या भ्रष्ट व्यवस्थेतील चेहऱ्यांनाच तिकीट देतात, यावर आगामी निवडणुकीचा सूर ठरेल.

# जनतेचा आवाज, सत्याचा सैनिक पंकज मंडलिक आता जिल्हा परिषदेसाठी मैदानात

अंबड तालुक्यातील जामखेड सर्कल गेल्या काही वर्षांत जामखेड सर्कलच्या राजकारणात एक नाव लोकांच्या मनात ठामपणे रुजलं आहे पंकज मंडलिक.पद,सत्ता वा लाभासाठी नव्हे; तर जनतेच्या हक्कांसाठी,न्यायासाठी आणि सत्यासाठी लढणारा हा तरुण कार्यकर्ता आता जिल्हा परिषदेसाठी मैदानात उतरला आहे.जनतेचा प्रश्न म्हणजे स्वतःचा प्रश्न जामखेड सर्कलमध्ये आरोग्य केंद्रातील बेफिकिरी असो घरकुल योजनांतील भ्रष्टाचार असो किंवा अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे त्रस्त झालेली जनता असो पंकज मंडलिक यांनी नेहमी निर्भीडपणे आवाज उठवला.अवैध बांधकामे,सार्वजनिक ठिकाणांवरील कब्जे,राष्ट्रीय पेयजल योजनेतील गैरव्यवहार यावर त्यांनी सातत्याने प्रशासनास प्रश्न विचारले.शाळा,अंगणवाड्या आणि पशुवैद्यकीय दवाखान्यांतील गैरप्रकार त्यांनी उघडकीस आणले आणि प्रशासनाला सतर्क केले.

भ्रष्टाचाराविरुद्ध तडजोड नाही पंकज मंडलिक यांची एक ठाम भूमिका आहे भ्रष्टाचाराविरुद्ध तडजोड नाही रात्रीचा वेळ असो वा सकाळचा गावात पाणी बंद पडलं,लाईट गेली,एखादं काम अडकलं लोकांचा पहिला फोन जातो तो पंकज मंडलिक यांनाच. ते लगेच अधिकाऱ्यांना संपर्क करतात अनेकदा कार्यालयात जाऊन लोकांची कामं करून घेतात. तहसील कार्यालय, पोलीस स्टेशन, तलाठी ऑफिस जनतेला त्रास झाला की ते स्वतः त्या दारात हजर असतात.

धर्म, संस्कृती आणि माणुसकीचं राजकारण जामुवंत गडावरील भ्रष्टाचारावर आवाज उठवणारा, गोमातेच्या संरक्षणासाठी उभा राहणारा देवस्थानांच्या सन्मानासाठी ठाम उभा राहणारा असा हा सामाजिक आणि धार्मिक जाण असलेला कार्यकर्ता. पंकज मंडलिक अभिमानाने सांगतात धर्म,माणुसकी आणि सत्य हेच माझं राजकारण आहे संधी नव्हे, सेवा हवी त्यांचं मत स्पष्ट माझ्याकडे आश्वासन नाही पण मी खोटं बोलणार नाही. मला सत्तेची आस नाही पण अन्यायाविरुद्ध शांत बसणं पाप आहे आणि मी ते पाप करणार नाही. आज ते जिल्हा परिषदेसाठी उभे आहेत पण हेतू सत्ता उपभोगण्याचा नाही तर गावच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्याचा आहे. जनतेचा विश्वासच खरी ताकद पंकज मंडलिक यांच्याकडे मोठा पक्ष नाही, पैसा नाही पण आहे लोकांचा विश्वास. गोरगरीब,शेतकरी,कामगार, विद्यार्थी सगळ्यांचं एकच म्हणणं हा माणूस आमच्यासाठी बोलतो आमच्यासाठी भांडतो. का द्यायचं मतदान पंकज मंडलिक यांना ? त्यांनी भ्रष्टाचाराविरुद्ध ठाम आवाज उठवला, त्यांनी जनतेचा प्रश्न स्वतःचा मानला, त्यांनी कधी खोटं आश्वासन दिलं नाही, ते जनतेच्या न्यायासाठी झटणारे योद्धे आहेत, माझ्या गावासाठी माझ्या लोकांसाठी मी थांबलो नाही, थांबणार नाही. मतदान रुपी बळ द्या बाकीचं आयुष्य मी तुमच्यासाठी लढण्यात घालवीन. गोरगरिबांचा आधार,सत्याचा सैनिक पंकज मंडलिकजिल्हा परिषद उमेदवार । जामखेड सर्कल,अंबड तालुका


पंकज मंडलिक
जय श्रीराम
जामुवंत महाराज की जय

# किरकोळ कारणावरून युवकावर धारदार शस्त्राने हल्ला; गंभीर जखमी

धारूर । प्रतिनिधी

धारूर शहरात किरकोळ कारणावरून युवकावर धारदार शस्त्राने प्राणघातक हल्ला झाल्याची धक्कादायक घटना बुधवारी (ता. ६) घडली. या हल्ल्यात पानटपरी चालक हनुमंत शिवाजी फावडे (वय २७, रा. गायकवाड गल्ली) गंभीर जखमी झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, काही तरुणांमध्ये किरकोळ वाद झाल्यानंतर संतापाच्या भरात अज्ञात व्यक्तीने फावडे यांच्यावर धारदार हत्याराने वार केले. घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली.जखमी फावडे यांना तात्काळ धारूर ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी त्यांना अंबाजोगाई येथील स्वराती रुग्णालयात हलविण्यात आले आहे.घटनेची माहिती मिळताच धारूर चे सहाय्यक पोलीस निरीक्षक देविदास वागमोडे यांनी घटनास्थळी धाव घेतली. या प्रकरणी गुन्हा



दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून आरोपी फरार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. आरोपीचा शोध सुरू आहे.







प्रतिनिधी @ बीड

अतिवृष्टी आणि पूरस्थितीमुळे बीड जिल्ह्यात झालेल्या मोठ्या नुकसानीची पाहणी केंद्रीय पथकाने आज (५ नोव्हेंबर) केली. पथकात एसव्हीएसपी शर्मा, विशाल पांडे यांचा समावेश होता. पथकाने विविध गावांमधील नुकसानीची पाहणी करत शेतकऱ्यांशी संवाद साधला आणि नुकसानीचा अंदाज घेतला. पथकाच्या दौऱ्यात नोंदवलेल्या नुकसानीच्या प्रकारानुसार, अनेक ठिकाणी शेतीचे आणि मालमत्तेचे मोठे नुकसान झाले आहे.दौऱ्याची सुरुवात बीड तालुक्यातील लिंबा रुई येथून झाली, जिथे शेती, पीक आणि जमीन खरडून जाणे, तसेच विहिरी गाळाने भरणे अशा स्वरूपाचे नुकसान आढळले. शिरूर कासार तालुक्यातील येवलवाडी येथे पूल आणि रस्ता वाहून गेल्यामुळे दळणवळणाचे मोठे नुकसान झाले आहे. कारेगाव (ता. पाटोदा), घाटपिंपरी, देवळाली (ता. आष्टी)येथे देखील जमीन खरडून जाणे आणि शेती पिकाचे मोठे नुकसान झाल्याची नोंद घेण्यात आली. घाटापिंप्री येथे जमीन खरडून जाण्याचे तर देवळाली येथे फळबाग नुकसानीचे प्रमाण मोठे असल्याचे पथकाच्या निदर्शनास आले.पाहणी दौऱ्या दरम्यान उपविभागीय अधिकारी कविता जाधव, वसीमा शेख, तहसीलदार चंद्रकांत शेळके, वैशाली पाटील, सुरेश घोळवे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे आदींसह सर्व विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

सायं.दैनिक
# विश्वनायक
Email : vishvanayak94@gmail.com
• संपादक : बिलाल शेख • Mo-9422404740



# फसवणूक प्रकरणात आरोपींना अटकपूर्व जामीन मंजूर





शिवाजीनगर पोलिस स्टेशन बीड अंतर्गत गुन्हा क्र ३७६/२०२५ या प्रकारणातील आरोपीचा अटकपूर्व जामीन मंजुर आरोपी तर्फे वकिल अँड शेख सद्दाम शेख इस्माईल ,अँड आदर्श जाधव यांनी काम पाहिले भारतीय दंड संहितेच्या कलम ३४, ४२०, ४४७, ४४८, ४६५, ४६८, ४७१ अंतर्गत दाखल झालेल्या फसवणूक, बनावट कागदपत्र तयार करणे व अतिक्रमण या गंभीर आरोपांच्या प्रकरणात आरोपींना अटकपूर्व जामीन मंजूर करण्यात आला आहे.

या प्रकरणात आरोपींवर फसवणुकीच्या माध्यमातून जमीन व्यवहारात खोटे दस्तऐवज तयार करून अतिक्रमण केल्याचा आरोप होता. या संदर्भात पोलीस तपास सुरू असताना आरोपींनी अटक होण्याची शक्यता लक्षात घेऊन मा. जिल्हा व सत्र न्यायालयात अँड शेख सद्दाम शेख इस्माईल ,अँड आदर्श अरुण जाधव यांच्यामार्फत अटकपूर्व जामीनासाठी अर्ज दाखल करण्यात आला होता.

०५/११/२०२५ रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान ड. आदर्श जाधव व ड. सद्दाम शेख यांनी आरोपींच्या वतीने प्रभावी युक्तिवाद मांडत न्यायालयासमोर सर्व बाबी स्पष्ट केल्या. युक्तिवाद ऐकून मा.न्यायालयाने परिस्थितीचा सखोल विचार करून ०६/११/२०२५ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपींना अटकेपासून संरक्षण देत अटकपूर्व जामीन मंजूर केला.

# डॉ. राधा तांबे यांचा ब्रह्मकुमारी संघटनेच्या ९० व्या वर्धापनदिनानिमित्त गौरव

बीड : ब्रह्मकुमारी संघटनेच्या स्थापनेला ९० वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने बीड जिल्ह्यात विविध क्षेत्रात समाजसेवा करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. ब्रह्मकुमारी संघटना सध्या ११० देशांमध्ये कार्यरत असून तिचे सुमारे दहा लाख अनुयायी आहेत.

प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय, बीडच्या प्रमुख प्रज्ञा दीदी यांच्या हस्ते योग क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या आंतरराष्ट्रीय खेळाडू डॉ. राधा तांबे यांचा 'सत्कारमूर्ती' म्हणून गौरव करण्यात आला.या कार्यक्रमात मिस इंडिया ईशा अग्रवाल, या सुप्रसिद्ध तेलुगू अभिनेत्री, विशेष अतिथी म्हणून उपस्थित होत्या. तसेच कार्यक्रमाचे मुख्य वक्ते राज्ययोगी प्रो. ई. व्ही. गिरीश यांनी अध्यात्म, योग आणि मानवतेच्या एकात्मतेवर प्रेरणादायी विचार मांडले.



डॉ. तांबे गेल्या पाच ते सहा वर्षांपासून योगाच्या माध्यमातून समाजासाठी अविरत कार्य करत आहेत. तसेच त्या राधिका अँडव्हान्स योग सेंटर च्या माध्यमातून ऑनलाईन आणि ऑफलाईन योग प्रशिक्षण वर्ग चालवतात. शिवाय त्या अनेक वर्षांपासून चराटा प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये योग प्रशिक्षक म्हणून रुग्णांची योगाच्या माध्यमातून सेवा करतात व पारंपारिक भारतीय चिकित्सक (आयुष )पद्धतीने त्यांना निरोगी आणि सुदृढ करण्याकडे त्यांचा भर असतो. त्यांच्या प्रयत्नांमुळे अनेकांच्या आरोग्यात सकारात्मक बदल घडून आला असून, सुदृढ व निरोगी व्यक्तिमत्त्व घडवून सशक्त समाजनिर्मितीत त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे.

# आम आदमी पार्टीची नगरपरिषद निवडणुकीसाठी जोरदार तयारी!

**माजी सैनिक अशोक येडे, जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी**



बीड (प्रतिनिधी) - आम आदमी पार्टीने बीड जिल्ह्यातील नगरपरिषद निवडणुका स्वबळावर लढण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. पक्षाने नगराध्यक्ष व नगरसेवक पदासाठी इच्छुक उमेदवारांना संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

या संदर्भात माजी सैनिक अशोक येडे, जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी - बीड यांनी माहिती देताना सांगितले की, आम आदमी पार्टी महाराष्ट्रातील सर्व निवडणुका स्वबळावर आणि स्वातंत्र्याने लढणार आहे.ते पुढे म्हणाले की, नगरपरिषद निवडणुकीत आम आदमी पार्टीच्या तिकिटावर उमेदवारी दाखल करण्याची इच्छा असलेल्या कार्यकर्त्यांनी, तरुणांनी आणि नवयुवकांनी तात्काळ संपर्क: ९४०५४५८७२१, ९७ ६७ ८१ ५७ २७, ९४ २२ ५९ १८ ०९ या नंबर वर आपण संपर्क करू शकताएकत्र येऊ, स्वच्छ राजकारण घडवू - आम आदमी पार्टी जनतेचा आवाज! असे आवाहन माजी सैनिक श्री. अशोक येडे यांनी केले आहे.

# प्रभाग क्र. २३ मधून अखील इनामदार यांना उमेदवारी द्यावी; नागरिकांची आ. संदीप क्षीरसागर यांच्याकडे मागणी!

बीड (प्रतिनिधी): नगरपालिका निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होताच जिल्ह्यातील राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. सर्वच पक्षातील नेते आणि इच्छुकांनी निवडणुकीच्या तयारीला कंबर कसली असताना, बीडमधील प्रभाग क्रमांक २३ मधील नागरिकांनी एक महत्त्वपूर्ण मागणी पुढे आणली आहे. या प्रभागातील नागरिकांच्या सुखदुःखात सहभागी होणारे, अडीअडचणींची सोडवणूक करणारे, तरुण आणि तडफदार समाजसेवक अखील इनामदार यांना आमदार संदीप क्षीरसागर यांनी उमेदवारी द्यावी, अशी तीव्र इच्छा स्थानिक नागरिक व्यक्त करत आहेत.

तरुण नेतृत्वासाठी नागरिकांचा आग्रह

अखील इनामदार हे आमदार संदीप क्षीरसागर यांचे निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. प्रभाग क्र. २३ मध्ये त्यांची जनसंपर्काची मोठी ताकद आहे. नागरिकांच्या मते, इनामदार हे केवळ निवडणुकीपुरते नव्हे, तर सातत्याने लोकांमध्ये राहून त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी तत्पर असतात.समाजात सक्रिय असणारे आणि विकासाची दृष्टी असलेले अखील इनामदार यांच्यासारख्या तरुण नेतृत्वाला संधी मिळाल्यास



प्रभागाचा कायापालट होईल, असे मत या प्रभागातील नागरिक व्यक्त करत आहेत.पायाभूत सुविधांचा विकास हाच अजेंडा प्रभाग क्रमांक २३ हा मागील काही वर्षांमध्ये झपाट्याने नागरी स्वरूपाने वाढलेला भाग आहे. त्यामुळे येथे पायाभूत सोयी-सुविधा, शैक्षणिक सुविधा, आरोग्य सेवा आणि वाहतूक सुविधा यांची मागणी वाढली आहे. या पार्श्वभूमीवर, अखील इनामदार यांनी नागरिकांशी चर्चा करून दीर्घकालीन विकास आराखडा तयार करण्याची भूमिका घेतली आहे.स्थानिक नागरिकांच्या या आग्रहामुळे आमदार संदीप क्षीरसागर यांच्यासमोर एक नवा पेच निर्माण झाला आहे. निष्ठावंत कार्यकर्त्याच्या मागणीला आणि त्याहून महत्त्वाचे म्हणजे, नागरिकांच्या सार्वत्रिक इच्छेला मान देऊन आमदार संदीप क्षीरसागर यांनी अखील इनामदार यांच्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब करावे, अशी 'एकच चर्चा' सध्या बीडच्या राजकीय वर्तुळात रंगली आहे.

# हमीभाव सोयाबीन खरेदी केंद्रे शेतकऱ्यांसाठी की व्यापाऱ्यांसाठी? :- डॉ.गणेश ढवळे

## हमीभाव खरेदीसाठी शेतकऱ्यांकडून नोंदणी सुरू; पण बहुतांश शेतकरी आधीच विक्री करून बसले



लिंबागणेश : महाराष्ट्र शासनाने केंद्र शासनाच्या मंजुरीनंतर २०२४-२५ हंगामासाठी हमीभाव खरेदी योजना सुरू केली असली, तरी प्रत्यक्षात या योजनेचा लाभ शेतकऱ्यांपेक्षा व्यापाऱ्यांनाच अधिक मिळणार का? असा प्रश्न शेतकऱ्यांच्या मनात निर्माण झाला आहे.

राज्यातील सोयाबीन, उडीद आणि मुग या प्रमुख पिकांच्या हमीभाव खरेदीसाठी शासनाने ३० ऑक्टोबरपासून ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया सुरू केली असून १५ नोव्हेंबरपासून प्रत्यक्ष खरेदी केंद्रांवर प्रक्रिया सुरू होणार आहे. मात्र जिल्ह्यातील वास्तव वेगळेच आहे - कारण अतिवृष्टी आणि आर्थिक अडचणींमुळे बहुतांश शेतकऱ्यांनी आपला माल आधीच खाजगी व्यापाऱ्यांना विकून टाकला आहे.

अतिवृष्टीचा फटका आणि विक्रीची घाई

अतिवृष्टीमुळे सोयाबीन पिकाची उत्पादकता आणि गुणवत्ता दोन्हीवर परिणाम झाला. त्यातच बियाणे, खत, कीटकनाशक या वाढत्या खर्चामुळे शेतकरी आर्थिक कोंडीत सापडले. परिणामी, मिळेल त्या भावात - ३५०० ते ४१०० प्रति क्विंटल दराने - अनेक शेतकऱ्यांनी सोयाबीन खाजगी व्यापाऱ्यांकडे विकले.

शासनाची खरेदी अजून सुरूच झालेली नसल्याने, शेतकरी म्हणतात की - पोटाची भूक थांबत नाही; खरेदी केंद्र वेळेवर सुरू झाली असती, तर फायदा झाला असता.

शासनाने बीड जिल्ह्यात २३ खरेदी केंद्रे निश्चित केली आहेत. मात्र खरेदी उशिरा सुरू होत असल्याने बाजारात व्यापाऱ्यांनी आधीच कमी भावाने मोठ्या प्रमाणात सोयाबीन खरेदी करून साठवणीस सुरुवात केली आहे.

त्यामुळे शासनाने ठरवलेली केंद्रे गोरगरीब शेतकऱ्यांसाठी आहेत की साठवणूक केलेल्या भांडवलदार व्यापाऱ्यांच्या आर्थिक फायद्यासाठी? असा संतप्त सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेश) यांनी उपस्थित केला आहे.

शेतकऱ्यांसाठी अटींचा पेच

हमीभाव खरेदीसाठी नोंदणी करताना शेतकऱ्यांना आधार कार्ड, बँक पासबुक, सातबारा उतारा, पीक पेरा नोंद, केवायसी इत्यादी कागदपत्रे सादर करावी लागतात.अनेक शेतकऱ्यांना इंटरनेट सुविधा व तांत्रिक मदत नसल्याने नोंदणी करणे अवघड ठरत आहे.


योजना चांगली आहे, पण वेळेवर अंमलबजावणी आणि साधनांची सोय नसेल, तर ती शेतकऱ्यांपर्यंत कशी पोहोचणार? असा प्रश्न अनेकांकडून विचारला जात आहे.

ड मात्र प्रत्यक्षात प्रश्न कायम - ही योजना शेतकऱ्यांसाठी की व्यापाऱ्यांसाठी?

कारण हमीभाव केंद्रे उघडण्यापूर्वीच बाजारात माल विकला गेला, आणि उर्वरित शेतकरी तांत्रिक अडचणींमुळे नोंदणी करू शकलेले नाहीत. परिणामी या योजनेचा प्रत्यक्ष लाभ किती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचेल याबाबत लिंबागणेश येथील शेतकरी मोहन कोटुळे, अंकुश जाधव, रामचंद्र मुळे, प्रमोद निर्मळ, अनंत आमटे, अशोक खिल्लारे, अंकुश वाणी, साहेबराव ढवळे, आण्णा खिल्लारे, महादेव ढवळे आदींमध्ये संशय निर्माण झाला आहे.

# बीडचे कामगार अधिकारी कोणाळे माहित आहेत का ? प्रा सापनकर

**अनेक दिवसापासून कामगार अधिकारी कार्यालयात नसतात ! रिकामी खुर्ची आयुक्त कार्यालयाला जमा करावी आर पी एल बोगस कामांना यांचा आशीर्वाद आहे का ?**




बीड /प्रतिनिधी

बांधकाम कामगार व कामगार ऑफिस अंतर्गत येणाऱ्या आठ वेगवेगळ्या कामगारांसाठी केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्या माध्यमातून सांगितल्याप्रमाणे कामगार कौशल्य वृद्धी प्रशिक्षण योजना बीड जिल्ह्यात चालू झाली आहे या अंतर्गत नामवंत अशी कंपनी या ठिकाणी काम करत आहे या कंपनीच्या अधिपत्याखाली व या असणाऱ्या कामगार अधिकारी श्री कोणाले साहेब यांच्या मार्गदर्शनाने व त्यांच्या अधिकाराने बीड जिल्ह्यात या योजनेचा शुभारंभ चालू आहे.

परंतु गेली पंधरा दिवसापासून विविध कारणे सांगून या ठिकाणचे कामगार अधिकारी म्हणून स्वतः स्वतःला स्वयंघोषित आयुक्त म्हणून समजून घेणारे कोणाले साहेब यांचा मनमानी कारभार या ठिकाणी दिसून येत आहे वारंवार या कार्यालयात कामगार आपले योजनेविषयी माहिती घेण्यासाठी जात असताना या ठिकाणी केव्हाच हे यांच्या केबिनमध्ये सापडत नाहीत या ठिकाणी विचारणा केली असता साहेब आले नाहीत आले होते गेले अशाच प्रकारचे या ठिकाणच्या असणाऱ्या कर्मचाऱ्यां कडून उत्तरे मिळत आहेत आणि हा सर्व कारभार फोन द्वारेच यांचा चालत आहे यामुळे येणाऱ्या काळात या खुर्चीची या ठिकाणी आवश्यकता नाही त्यांच्या केबिनची ऑफिसची आवश्यकता नाही असा कामगारांचं या ठिकाणी म्हणणं आहे यामुळे या खुर्चीवर जर या अधिकाऱ्यांना बसायचं नसेल तर खुर्ची रिकामी करून ती आयुक्त कार्यालयात पाठवून द्यावी असा या ठिकाणच्या असणाऱ्या कामगारांचे म्हणणे आहे व लवकरच त्यासाठी सामाजिक कार्यकर्ते पुढे येऊन खुर्ची आयुक्तांना पाठवून देण्याचा निर्णय घेण्यात येणार आहे.

असेही या ठिकाणी माहिती घेतली असता उग्र कामगारांच्या व कार्यकर्त्यांच्या प्रतिक्रिया ऐकला मिळाल्या

कौशल्य वृद्धी प्रशिक्षण योजना कंपनीची ,अधिकारी यांची की शासनाची

या ठिकाणी या योजनेविषयी काम करत असणाऱ्या कंपनीला कामगार अधिकारी हेच पाठबळ देत आहेत व त्यांच्या चुका लपवून ठेवण्याचा प्रयत्न करत आहेत त्यामुळे या कंपनीला कुठलाच धाक नसून कंपनीचा सुद्धा मनमानी कारभार या ठिकाणी चालू आहे आणि बोगस बिल उचलण्याचा त्यांचा प्रयत्न या ठिकाणी चालू आहे त्यामुळे ही योजना कंपनीची अधिकाऱ्यांची की शासनाची आहे हा प्रश्न अधोरेखितच आहे.

# वीरशैव लिंगायतांचा निर्धार,यंदा बीड नगराध्यक्षपदाची निवडणूक लढाईची आणि जिंकायची ही !

## नगराध्यक्षपदाची निवडणूक लढवण्यासाठी समाजातून उस्फूर्त मागणी - वैभव स्वामी


बीड /प्रतिनिधी

**बीड नगराध्यक्षपद अनुसूचित जाती महिला प्रवर्गासाठी राखीव झाले आहे. आरक्षणामुळे वीरशैव लिंगायत समाजातील स्वामींना नगरपालिकेच्या इतिहासात पहिल्यांदाच थेट नगराध्यक्ष होण्याची संधी यामुळे लाभणार आहे. ही संधी स्वीकारून यंदाची बीड नगराध्यक्षपदाची निवडणूक लढाईची आणि जिंकायची ही असा निर्धार वीरशैव लिंगायत समाजाने केला आहे. समाजातून निवडणूक लढवण्यासाठी उत्स्फूर्तपणे झालेल्या मागणीचा विचार करून निवडणूक लढवण्याचा निर्धार केला असल्याचे पत्रकार वैभव स्वामी यांनी स्पष्ट केले आहे.**

बीड शहराच्या सर्वांगीण विकासासाठी नगराध्यक्षपदी उच्चशिक्षित सुसंस्कारित महिला नगराध्यक्ष होणे काळाची गरज आहे. आरक्षणामुळे पहिल्यांदाच बीड नगरपालिकेवर अनुसूचित जाती महिला प्रवर्गाला संधी मिळणार आहे. या संधीच सोनं करण्यासाठी वीरशैव लिंगायत समाजातील स्वामी समाजातून निवडणूक लढवण्यासाठी उस्फूर्तपणे समाज पुढे आला आहे. समाजाच्या भावना लक्षात घेऊन बीड नगराध्यक्ष पदाची निवडणूक लढवायची आणि जिंकायची देखील असा निर्धार समाजानेच केला आहे त्यामुळे बीड नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीसाठी उच्चशिक्षित सुसंस्कारित कोणतीही राजकीय पक्षाशी निगडित नसलेली युवा तरुणी म्हणून बहिणीला नगराध्यक्ष पदाची निवडणूक लढवण्यासाठी उभे करण्याचा निर्धार पत्रकार वैभव स्वामी यांनी घेतला आहे या भूमिकेचे वीरशैव लिंगायत समाजासह सर्व समाजातून उस्फुर्त स्वागत होत आहे.

स्वच्छ आणि उच्चशिक्षित उमेदवार

बीड नगराध्यक्ष पदासाठी पत्रकार वैभव स्वामी यांची बहीण जी एमएससी ॲग्री झालेली आहे. सद्यस्थितीत ती एमपीएससीचा अभ्यास करत आहे.



त्यामुळे बीड नगराध्यक्ष या पदासाठी स्वच्छ प्रतिमेची आणि उच्चशिक्षित उमेदवार म्हणून तिला सर्व समाज स्वीकारेल असा विश्वास वीरशैव लिंगायत समाजासह सर्व समाजातून व्यक्त होत आहे.

उमेदवाराला विचारवंत राजकीय वारसा..

बीड नगराध्यक्ष पदासाठी पत्रकार वैभव स्वामी यांच्या बहिणीचे नाव वीरशैव लिंगायत समाजातून पुढे आले आहे.या कुटुंबीयांना विचारवंत, निष्ठावंत असलेले केज विधानसभा मतदारसंघाचे पहिले आमदार ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक रामलिंग स्वामी तसेच उमेदवाराचे आजोबा जे चंपावती विद्यालयाचे शिस्तप्रिय प्रामाणिक शिक्षक आणि स्वातंत्र सैनिक म्हणून सुपरिचित होते ते विश्वनाथ स्वामी असून उमेदवाराचे चुलत आजोबा येळंबघाट या गावचे अनेक वर्ष सरपंच देखील होते. उमेदवाराचे भाऊ पत्रकार वैभव स्वामी यांनी केज विधानसभा अनुसूचित जाती राखीव मतदार संघातून दोन वेळा प्रामाणिकपणे लढवली. या मतदारसंघातील मतदारांनी त्यांना दहा हजारापेक्षा अधिक मते देऊन त्यांच्या प्रामाणिक आणि सामाजिक कर्तुत्वावर शिक्कामोर्तब केलेले आहे.त्यामुळे स्वामी कुटुंबीयांना राजकीय वारसा देखील असल्यामुळे याचा फायदा हा या येणाऱ्या तिसरा पिढीला नगरपालिकेच्या निवडणुकीत निश्चित होईल अशी चर्चा आता सर्वत्र होत आहे.

बीड नगरपालिकेच्या इतिहासात नगराध्यक्ष पदासाठी दिव्या स्वामी राजकीय दिव्य सिद्ध करणार ?

बीड नगरपालिकेच्या इतिहासामध्ये वीरशैव लिंगायत समाजातून नगराध्यक्षपदाची निवडणूक पत्रकार वैभव स्वामी यांची बहीण दिव्या महेश स्वामी या लढवणार आहेत. उच्चशिक्षित, सुसंस्कारित, अतिशय सामान्य कुटुंबातील त्या असून प्रतिकूल परिस्थितीवर मात करणारे हे कुटुंबीय असताना देखील समाजाच्या आग्रहास्तव निवडणुकीच्या आखाड्यात उतरण्याचे धाडस करत आहे. समाजाने नोट आणि वोट देण्याचा निर्धार केला आहे. त्यामुळे या नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत दिव्या स्वामी या नवा इतिहास रचत नवे राजकीय दिव्य निर्माण करतील अशी शक्यता आत्ताच होऊ लागली आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक शेख बिलाल शेख युसुफ यांनी आर.एम. प्रिंटर्स, बार्शी रोड बीड - ४३११२२ येथे छापून सायं.दैनिक विश्वनायक कार्यालय, खासबाग खाजानगर देवी रोड, बीड ता.बीड जिल्हा बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशितकेले आहे.संपादक शेख बिलाल शेख युसुफ मो.८६८६८८८८९८ Email : vishvanayak94@gmail.com